# जिल्हा परिषद रत्नागिरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन**
**माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२**

## समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथमिक)

**दूरध्वनी क्र.:- ०२३५२-२७१००६ ई-मेलः-samgra.rtn@yahoo.com**


जा.क्र.रजिप/शिक्षण/स. शि.५/ RAA / ८७८ /२०२५-२६ दिनांक :- २१ . ११ .२०२५

प्रति,

मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, रत्नागिरी.

| | |
|---|---|
| विभागाचे नाव | समग्र शिक्षा जि. प. रत्नागिरी |
| अद्यावत / अपडेट प्रकार | दरपत्रक मागविणेबाबत |
| विषय | जि.प.शाळेतील ७५ विद्यार्थ्यांचा राज्याबाहेर अभ्यासदौरा केरळ, कन्याकुमारी येथे आयोजित करणे. |
| प्रसिध्द करावयाचा दिनांक | २४ / ११ /२०२५ |
| दरपत्रके सादर करणेचा कालावधी | २४ / ११ /२०२५ ते ०४ / १२ /२०२५ |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | ०२ / १२ /२०२५ |

दिनांक :- २१/११/२०२५

(किरण लोहार)
**शिक्षणाधिकारी (प्राथ.),**
**जिल्हा परिषद, रत्नागिरी.**

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

# जिल्हा परिषद रत्नागिरी

समग्र शिक्षा Samagra Shiksha

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन

माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२

## समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथमिक)

दूरध्वनी क्र.:- ०२३५२-२७१००६ ई-मेल:-samgra.rtn@yahoo.com


जा.क्र.रजिप/शिक्षण/स. शि.५/ RAA/८६२/२०२५-२६ दिनांक :- १९. ११ .२०२५

प्रति,

________________________

________________________

**विषय :- दरपत्रके पुरविणेबाबत.**

समग्र शिक्षा ,शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद ,रत्नागिरी मार्फत केरळ येथे विद्यार्थ्यांच्या अभ्यासभेटी चे आयोजन करावयाचे आहे . अभ्यासदौ-याकरिता रक्कम रु. ६,३७,५००.०० लक्ष मंजूर आहेत . अभ्यासदौ-याचा कालावधी ५ दिवसांचा असेल .यात इ. ६वी ते इ.९वी च्या ७१ विद्यार्थी (५०% मुले व ५०% मुली ) + समन्वयक असे एकूण ७५जणांचा समावेश असेल .सदर अभ्यासदौ-याकरिता खालीलप्रमाणे दरपत्रकाची आवश्यकता आहे.

१. रत्नागिरी ते केरळ (तिरुअनंतपूरम) येथे स्लिपर कोच रेल्वे प्रवास बुकींग (जाणे व येणे दोन्ही)

२. रेल्वे स्थानक ते निवास ठिकाण पर्यंत सोडणे. तसेच अभ्यासभेटी दरम्यान स्थानिक स्थळ दर्शनासाठी (ISRO, प्राणी संग्रहालय, म्युझियम इ.) आणि तिरुअनंतपूरम ते कन्याकुमारी येथे जाणे व येणे करिता चांगल्या प्रतीची स्थानिक वाहन सुविधा (७५ व्यक्तींसाठी ) पुरविणे.

३. निवास व्यवस्था कालावधी (७५ व्यक्तींसाठी ) दोन रात्री तीन दिवस साठी करणे.

प्रमाणे दरपत्रके आठ दिवसांचे आत बंद लिफाफ्यात दरपत्रके शिक्षण विभाग (प्राथ.), जि.प. रत्नागिरी येथे सादर करण्यात यावीत.

A) प्रवासाच्या कालावधीमध्ये प्रवासाचे ठिकाण किंवा अंतर जास्त किंवा कमी होऊ शकेल.

**B) ISRO येथे विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा आयोजित केल्याच्या अनुभव योग्य त्या पुराव्यासह सादर केल्यास प्राधान्य देण्यात येईल.**

**C) निविदाधारकाने करायची कामे-**

१. प्रवासा दरम्यान नाष्टा व जेवण, निवास (विद्यार्थी सुरक्षितता व सर्व सोयी सुविधा आवश्यक) व प्रवास याची सर्व जबाबदारी आपणावर राहील.

२. रेल्वे प्रवासासाठी तिकीट आरक्षण करणे. (जाताना- रत्नागिरी ते केरळ व परत रत्नागिरी ) तिकीट आरक्षण झाल्यानंतर आरक्षणाचा दिनांक वेळ (परतीसह) कार्यालयास अवगत करणे. त्यानुसार जाण्या-येण्याचे वेळापत्रक तयार केले जाणार आहे.

**३. अभ्यासदौऱ्या**साठी आवश्यक असलेल्या परवानग्या ( रेल्वेप्रवास, ट्रॅव्हलर्स प्रवास, हॉटेल, स्पेस स्टेशन, म्युझियम या ठिकाणांना भेट देण्यासाठी आवश्यक असणा-या परवानग्या, नाव नोंदणी इ. प्राप्त करुन घेणे व गरजेनुसार शुल्क भरणे. टोल व पार्किंग चार्जेस इ.)

४. दौ-याच्या कालावधीत मुक्कामाच्या ठिकाणी थ्री स्टार दर्जाच्या हॉटेलमध्ये राहण्याची व जेवणाची व्यवस्था करणे, प्रवासा दरम्यान विद्यार्थ्यांसाठी फुड पॅकेट उपलब्ध करुन देणे. (शाकाहारी व मांसाहारी मागणीनुसार) भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था, प्रवास, नाष्टा चहा, पाणी, गाडी पार्कींग इत्यादीची व्यवस्था करावयाची आहे.

५. मुक्कामा दरम्यान विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र रुम्स (एका खोलीमध्ये ३ व्यक्तींप्रमाणे) सर्व अत्यावश्यक साधनांसह व अधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र रुम्स (खोली) उपलब्ध करावयाच्या आहेत. विद्यार्थीसमवेत त्यांच्या कक्षात पुरूष शिक्षक/कर्मचारी व विद्यार्थीनींच्या कक्षात महिला शिक्षक/कर्मचारी मुक्कामी असणार आहेत.

**D) दरपत्रकधारकाची जबाबदारी-**

१. प्रवासादरम्यान आवश्यक असलेल्या वस्तूंचा / सेवांचा सुस्थितीत पुरवठा करण्याची जबाबदारी मंजुर दरपत्रक धारकाची असेल.

२. प्रवासादरम्यान पुरविण्यात येणारा सेवांचा तपशील (उदा. पाणी बाटली, नाश्ता, जेवणात देण्यात येणारे पदार्थ, राहण्याची ठिकाणे, राहण्याची व्यवस्था इ.) दौरा सुरु होण्याच्या दिनांकाच्या ८ दिवस अगोदर या कार्यालयास कळविणे तसेच त्यात काही बदल सुचविल्यास त्या प्रमाणे बदल करणे बंधनकारक आहे.

३. प्रवासादरम्यान पुरविलेल्या अन्नातून विषबाधा (Food Poisoning) वगैरे आरोग्य विषयक समस्या उद्भवल्यास त्यास दरपत्रकधारक जबाबदार असेल आणि त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. अशा समस्या उद्भवणार नाही याची मंजूर

दरपत्रकधारकाने दक्षता घ्यावयाची आहे.

**E) अग्रीम**- कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ५०% रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात येईल. कार्यारंभ आदेशानंतर ८ दिवसात निवास आणि प्रवासाच्या तिकिट बुकिंगच्या पावत्या सादर केल्यानंतर ४५% रक्कम अदा करण्यात येईल. उर्वरित ५% रक्कम दौऱ्याच्या यशस्वितेनंतर (पूर्ण झाल्यानंतर) अदा करण्यात येईल.

**F) दरपत्रकाच्या देयकाची रक्कम खालील प्रमाणे अदा केले जाईल.**

१. अभ्यासदौरा यशस्वीरित्या पुर्ण झाल्यानंतर निविदाधारकाने देयक सादर करावे.

२. देयक प्राप्त झाल्यानंतर त्यातून अग्रीम स्वरूपात घेतलेली रक्कम समायोजित करून उर्वरीत रक्कम आदा केली जाईल.

३. प्रवासादरम्यान पुरविलेल्या सेवा व सोयी सुविधांबाबत शैक्षणिक सहल समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अधिन राहून देयक आदा करण्यात येईल.

**G) शास्ती आणि दंड-**

१. विहित वेळापत्रकानुसार प्रवास न झाल्यास / ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी न पोहोचल्यास निविदाधारकास रू.१,०००/- प्रती तास या प्रमाणे दंड आकारला जाईल.

२. निविदाधारकाने अग्रीम स्वरूपात रक्कम घेऊनही विहित वेळेत सेवा पुरवली नाही तर त्याचेकडून त्याने घेतलेली अग्रीम स्वरूपातील रक्कम अधिक त्यावरील बाजारभावानुसार असलेले व्याज वसूल करण्यात येईल व असा निवादाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहील.

३. मंजुर निवीदाधारकास अग्रिम (Advance) मंजुर केल्यानंतर त्यांना ऐनवेळी शैक्षणिक सहलीत फेर-फार केला अथवा सहल करण्यास असमर्थता दर्शविल्यास, अथवा निविदेत नमुद केल्याप्रमाणे सेवा न पुरविल्यास अशा निविदाधारकाकडुन दिलेले संपुर्ण अग्रिम (Advance) वसुल करुन शास्ती म्हणुन अभ्यासदौऱ्याचा संपुर्ण खर्च वसुल केला जाईल व मंजुर निविदाधारकाविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाईल.तसेच बयाणा रक्कमही जप्त करण्यात येईल.

४. प्रवासादरम्यान पुरविलेल्या सेवा व सोयीसुविधांबाबत अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवाल असमाधानकारक असल्यास सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी ठरविलेली रक्कम दंड म्हणून देयकाच्या रकमेतून वजा करण्यात येईल.

**दरपत्रक लिफाफा**

अ) शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या**साठी प्रवासाच्या कालावधी करिता उतरवलेल्या अपघात विम्याची पावती.

दरपत्रक लिफाफ्या सोबत विम्याची पावती सादर करावयाची नाही. ज्या दरपत्रकधारकाची निविदा मंजुर होईल अशा दरपत्रकधारकास शैक्षणिक अभ्यासदौऱ्यासाठी सहभागी होणारे विद्यार्थी/अधिकारी/कर्मचारी/शिक्षक यांची माहिती उपलब्ध करुन दिली जाईल त्यांच्या शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या** दरम्यानच्या कालावधीसाठी उतरविलेल्या अपघात विम्याच्या पावत्या अभ्यासदौऱ्यापुर्वी या कार्यालयास सादर करावयाच्या आहेत.

ब) दरपत्रकधारकाने आपल्या कंपनीची नोंदणी बाबतचे कागदपत्र सादर करावयाचे आहेत. सोबत मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र ,ताळेबंदपत्रक,तसेच पॅन ,टॅन,जीएसटी च्या छायांकित प्रती सादर करावयाच्या आहेत.

क) बयाणा अनामत रक्कम भरण्यापासून सूट असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**दरपत्रके लिफाफा (BOQ)**

तांत्रिक कारणास्तव किंवा दरपत्रकामध्ये वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडे राखून ठेवले आहेत. तसेच या दरपत्रकामधील अटी व शर्ती या बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचा निर्णय हा अंतिम निर्णय राहील.

तसेच याबाबत काही तक्रार निर्माण झाल्यास न्यायालयीन कार्यकक्षा रत्नागिरी शहर राहील.

(किरण लोहार)
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी.**